दैनिक
द वाळवा क्रांती

# शेंडुरे महाविद्यालयात 'राष्ट्रीय मतदार दिन' साजरा

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

हातकणंगले तालुक्यातील हुपरी येथील चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालयामध्ये आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत २५ सप्टेंबर हा राष्ट्रीय मतदार दिन विविध स्पर्धांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला. महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राज्यशास्त्र आणि मानवी हक्क विभाग तसेच सांस्कृतिक विभाग व आय क्यू ए.सीच्या माध्यमातून राष्ट्रीय मतदार दिनाशी संबंधीत निबंध स्पर्धा आणि रांगोळी स्पर्धा घेण्यात आल्या. या



**शेंडुरे महाविद्यालयामध्ये आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत २५ सप्टेंबर हा राष्ट्रीय मतदार दिन विविध स्पर्धांच्या माध्यमातून साजरा करण्यात आला.**

स्पर्धेस विद्यार्थ्यांनी चांगला प्रतिसाद देऊन आपला सहभाग नोंदवला. यशस्वी विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पी. बी. पाटील यांनी प्रमाणपत्र व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास महाविद्यालयातील विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेत्तेर सेवक वर्ग उपस्थित होता. या स्पर्धांचे आणि कार्यक्रमाचे संयोजन राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रम अधिकारी श्रीमती एस.जे.माने यांनी केले.

AURANGABAD Edition
Jan 29, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com

दैनिक
द वाळवा क्रांती

# आजच्या युवकाने ज्ञान आणि कौशल्य विकसित करून श्रमाचे संस्कार ही स्वत:मध्ये रुजवणे गरजेचे

## - एच.एस.वनमोरे

**दै. वाळवा क्रांती \ रेंदाळ**

युवा वर्गावर देशाच्या विकासाची जबाबदारी आहे.त्यामुळे आजच्या युवकाने ज्ञान आणि कौशल्य विकसित करण्याबरोबरच श्रमाचे संस्कार ही स्वतः मध्ये रुजवणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन माजी समन्वयक राष्ट्रीय सेवा योजना विभाग शिवाजी विद्यापीठाचे प्राचार्य डॉ.एच.एस. वनमोरे यांनी केले. ते चंद्राबाई शांताप्पा शेंडुरे महाविद्यालय हुपरीच्या तळंदगे गावामध्ये राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या उद्घाटन समारंभ कार्यक्रम प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून



**विशेष श्रमसंस्कार शिबीराच्या उद्घाटन समारंभ कार्यक्रम प्रसंगी एच.एस. वनमोरे**

बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या पी.बी.पाटील होत्या. यावेळी तळंदगे गावाचे उपसरपंच रंगराव धनगर , ग्रामविकास अधिकारी एस.पी.कांबळे , ग्रामपंचायत सदस्य , सदस्या ,गावातील प्रतिष्ठित नागरिक , शिक्षक - शिक्षकेत्तर सेवक वर्ग , विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्तविक कार्यक्रम अधिकारी श्रीमती एस.जे माने यांनी केले. सुत्रसंचालन कुमारी प्रणाली पाटील हिने केले तर प्रा. डॉ.व्ही.व्ही. पाडळकर यांनी आभार मानले.

AURANGABAD Edition
Mar 19, 2022 Page No. 4
Powered by : eReleGo.com